सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीआर ०३१८/प्र.क्र. ५/ १८-स
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ८ मार्च २०१८

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः सीसीआर-१४०८/प्र.क्र.४६२/२-स दि.२०. ४.२०१२
२) शासन निर्णय क्रमांकः सीसीआर-१४०८/प्र.क्र.४६२/२-स दि.११.१०२०१३
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.सआ१५/ सर्वसा/ सह.पुरस्कार २०१६-१७/१४८/२०१८ दि. १.३.२०१८
४) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. शताव्दी-२०१७/प्र.क्र. ०७/(भाग-१)/का-२९- अ दि. २३.ऑक्टोबर, २०१७ (सोबत प्राप्त झालेले मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या दि.२०.९.२०१७ च्या बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

उपरोक्त संदर्भाधीन वाचा क्र. १ मधील शासन निर्णय दि. २०.४.२०१२ अन्वये राज्यातील सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करीत असलेल्या सहकारी संस्थांना सहकार महर्षी, सहकार भूषण व सहकार निष्ठ याप्रमाणे पुरस्कार स्वरूपात रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व स्मृती चिन्ह प्रदान करून त्यांचा समारंभपूर्वक गौरव करण्यात येतो. वाचा येथील क्र. २ च्या शासन निर्णयान्वये पुरस्कारांची रोख रक्कम अनुक्रमे निश्चित केली आहे. सन २०१७ मध्ये सहकार महर्षी कै. शंकरराव मोहिते-पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यात आले असून त्यानिमित्त, सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्राप्रमाणे केलेल्या वर्गीकरणातील गट क्र. ९ प्राथमिक दूध उत्पादक संस्था, कुक्कुट पालन संस्था, मत्स्य पालन संस्था व पशुसंवर्धन संस्था या गटातील सहकार भूषण पुरस्कार "कै. शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार" या नावांने प्रदान करण्यात येत आहेत. राज्यातील पुरस्कार प्राप्त सहकारी संस्थांची अंतिम निवड करण्यासाठी मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या निवड समितीने दिलेल्या मान्यतेनुसार सन २०१६-१७ या वर्षासाठी सहकारी संस्थांना पुरस्कार देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहेः-

शासन निर्णय-

उपरोक्त वाचा येथील अ.क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सहकार भूषण या शीर्षकाखालील गट क्र. ९ प्राथमिक दूध उत्पादक संस्था, कुक्कुट पालन संस्था, मत्स्य पालन संस्था व पशुसंवर्धन संस्था या गटातील सहकार भूषण पुरस्कार "कै. शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार" या नावांने प्रदान

करण्यात येत आहेत. निवड समितीने गट क्र. ९ प्राथमिक दूध उत्पादक संस्था, कुक्कुटपालन संस्था, मत्स्यपालन संस्था व पशुसंवर्धन संस्था या गटातील पुढील पुरस्कारार्थी संस्थांची अंतिम निवड केली आहे. “कै. शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार” पुरस्कारासाठी पुणे विभागातील दोन दूध उत्पादक संस्थांना समान गुण मिळाले असल्याने निवड समितीने हा पुरस्कार विभागून देण्याचा निर्णय घेतला आहे.

अ.क्र.	पुरस्काराचे शीर्षक	महसूल विभाग	पुरस्कारार्थी सहकारी संस्थेचे नाव.
१	कै.शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार	पुणे विभाग (विभागून) (दूधउत्पादक संस्था)	श्री. हनुमान सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या. घोटवडे, ता राधानगरी, जि. कोल्हापूर
	कै.शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार	पुणे विभाग (विभागून) (दूधउत्पादक संस्था)	भोगावती सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या. सडोली, ता. करवीर, जि. कोल्हापूर
२	कै.शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार	नाशिक विभाग (दूधउत्पादक संस्था)	शुक्लेश्वर दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या. सुकेवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
३	कै.शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार	नागपूर विभाग (मत्स्यपालन संस्था)	इटियाडोह जलाशय मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था रामनगर, ता अर्जुनीमोर, जि. गोंदिया

३. केवळ गट क्र. ९ मधील कै. शंकरराव मोहिते पाटील सहकार भूषण पुरस्कार, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पुणे येथे आयोजित कृषि प्रदर्शन व सहकार परिषद या कार्यक्रमात प्रदान करण्यात येतील. सहकार महर्षि व अन्य गटांतील सहकार भूषण व सहकार निष्ठ पुरस्कारार्थींची अंतिम निवड यथावकाश करण्यात येत आहे.

४. कै. शंकरराव मोहिते-पाटील सहकार भूषण पुरस्कारासाठी निवड झालेल्या सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींना याबाबत माहिती देऊन त्यांना पुरस्कार प्रदान समारंभासाठी उपस्थित राहण्याबाबत कळवावे तसेच सदर माहिती कृषि विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्याची जबाबदारी सहकार आयुक्त, व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यावर सोपविण्यात येत आहे.

५. सदर तीन पुरस्काराच्या रोख रक्कमेचे धनादेश (प्रत्येकी रू. ५१०००/-), स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्रक यासाठी होणारा खर्च सहकार आयुक्त कार्यालयाने सहकार पुरस्कार-२०१५-१६ प्रदान कार्यक्रमासाठी सन

२०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय तरतुदीतून यापूर्वी शासन निर्णय क्रमांक पुरस्कार ०३१७/प्र.क्र.५४/२-स अन्वये उपलब्ध करून दिलेल्या रू. २५.०० लाख तरतुदीपैकी शिल्लक रक्कमेतून (रू. १,६२,१००/-) भागवावा. वरील पैकी क्र. १ येथील पुणे विभागातील दोन दूध उत्पादक संस्थांना पुरस्काराची रोख रक्कम विभागून द्यावी मात्र दोन्ही संस्थांना प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०८१३४७४२१४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.03.08 13:49:01 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव तथा सहनिबंधक सहकारी संस्था

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
७. मा. राज्यमंत्री(पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. राज्यमंत्री(पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
११. मा.विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य (सर्व)
१२. मा. मुख्यसचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१३. अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव(सहकार/वित्त/वस्त्रोद्योग/पणन/पदुम/उद्योग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे
१५. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. कृषी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. आयुक्त(पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय) महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. संचालक, हातमाग, यंत्रमागव वस्त्रनिर्माण, महाराष्ट्र राज्य , नागपूर

१९. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)
२०.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)
२१.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था(सर्व)
२२.जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग -१ सहकारी संस्था (सर्व)
२३.जिल्हा कोषागार अधिकारी पुणे
२४.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
२५.सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, उद्योग विभाग, पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई
२६.वेब को ऑर्डिनेटर, स.प.व.विभाग, मंत्रालय, मुंबई
२७.कार्यासन २-स निवडनस्ती.